# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. १२४–२०१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| श्री. मलकाप्पा गदगेप्पा पाटील,<br>मु. पो. सोन्याळ, ता. जत, जि. सांगली | अर्जदार |
| **विरूध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, संख, जि. सांगली | विरूध्द पक्षकार |

**कोरम** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. जी.बी. पानकर, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. मलकाप्पा गदगेप्पा पाटील, मु. पो. सोन्याळ, ता. जत, जि. सांगली यांनी आपली शेती गट क्र. ३२३ मध्ये ५ अश्वशक्तीसाठी दि. ७.७.२००९ रोजी नवीन शेती पंप वीज कनेक्शन मिळावे यासाठी चलन भरलेले आहे. तक्रारदार यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली येथे दि. ३.१०.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सांगली अंतर्गत कक्ष यांचेकडे तक्रार नोंदवून त्यांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे तक्रारदाराने दि. १४.१२.२००९ रोजी चाचणी अहवाल दिला असून वाहिनीचा विस्तार असलेने वितरण कंपनीने ३ महिन्यात वीज पुरवठा करणे गरजेचे होते, तथापि तसे न झालेने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे रितसर तक्रार क्र..४५३ दि. ३.१०.२००९ नुसार दाखल केली.

अंतर्गत कक्षाचा आदेश क्र. १०५४५ दि. २५.११.२००९ नुसार आदेश दिले की, तक्रारदारास विलंबापोटी एस.ओ.पी. प्रमाणे भरपाई द्यावी. तक्रारदाराने मंचाकडे दि. १९.६.२०१० रोजी तक्रार दाखल करुन वीज पुरवठा मिळावा व विलंबापोटी कृती मानके विनियमातील तरतुदीनुसार भरपाई मिळावी अशी तक्रारीत मागणी केली. तक्रार प्रतिनिधी श्री. खापरे यांचेमार्फत दाखल केली आहे.

वितरण कंपनीने आपल्या दि. ९.७.२०१० च्या लेखी अहवालात तक्रारदाराने शेतीपंपास नवीन विद्युत पुरवठा मिळावा यासाठी दि. ७.७.२००९ रोजी अर्ज करुन चलन भरल्याचे मान्य केले. परंतु जागेवर प्रत्यक्ष पाहणी केली असता संच मांडणी केलेली नाही, त्यामुळे संच मांडणी करुन नवीन चाचणी अहवाल सादर करण्यास सांगितल्याचे नमूद केले आहे

प्रस्तुत तक्रारीची सुनावणी दि. २७.७.२०१० रोजी घेतली असतां, तक्रारदाराचे प्रतिनिधी श्री. खापरे उपस्थित. वितरण कंपनीतर्फे प्रभारी सहाय्यक अभियंता, संख श्री. मैंलापुरे व श्री. कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता, कवठे महांकाळ विभाग उपस्थित. श्री. खापरे यांनी असे प्रतिपादन केले की, अंतर्गत कक्षाच्या आदेशाप्रमाणे तक्रारदाराने दि. १४.१२.२००९ दाखल केल्यामुळे नियमाप्रमाणे ३ महिन्याच्या मुदतीत म्हणजे दि. १३.३.२०१० पर्यंत वीज जोडणी देणे जरुरी होते, तथापि वि.प.ने तशी कार्यवाही केली नाही. वि.प.च्या अधिकाऱ्यांनी स्पॉट इन्स्पेक्शन केले ते एस.ओ.पी. प्रमाणे नाही. वितरण कंपनीतर्फे करण्यात आलेल्या इन्स्पेक्शनची कार्बन कॉपी श्री. मैंलापुरे यांनी मंचासमोर हजर केली.

वरील विवेचनावरुन खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित होतो.

१) कृती मानकांचे पालन करण्यात वि.प.ला अपयश आपल्याने तक्रारदार भरपाई देणे योग्य होईल काय ?

उत्तर : होय

<u>कारणमिमांसा</u>

तक्रारदार यांनी शेतीपंपास नवीन विद्युत पुरवठा मिळावा यासाठी दि. ७.७.२००९ रोजी अर्ज करुन चलन भरल्याचे वि.प.ने मान्य केले आहे. अंतर्गत कक्षाचे आदेशानुसार तक्रारदार यांनी दि. १४.१२.२००९ रोजी चाचणी अहवाल दिला आहे. श्री. मैंलापुरे यांनी जागेवर पहाणी केली असतां संच मांडणी के लेले नव्हती असे म्हटले आहे. यावरुन एक गोष्ट सिध्द होते की, वि.प.ने आपल्या दि. ९.७.२०१० च्या लेखी अहवालात स्पॉट इन्स्पेक्शन झाले आहे असे म्हटले आहे, परंतु प्रभारी सहाय्यक अभियंता श्री. मैंलापुरे यांनी सुनावणीच्यावेळी दिलेल्या तपासणी अहवालाची ११.७.२०१० ही तारीख दिली आहे. तसेच सहीची तारीख ११.७.२०१० धरली आहे. शेवटच्या कॉलममध्ये जागेची पडताळणी, उभारणीचा दाखला, मोटर जोडली आहे ? या कॉलमध्ये मोटर जोडली नाही, लाईन तयार नाही, पोल उभे नाहीत ही माहिती कार्बन कॉपीवन पेनने नंतर लिहीली आहे हे उघडच आहे. त्यामुळे अशा स्पॉट इन्स्पेक्शन अहवालाबाबत निश्चितपणे संशय निर्माण होतो. या प्रकरणात मंचाचे असे मत झाले आहे की, वि.प.चे नोडल ऑफीसर / कार्यकारी अभियंता यांनी मंचापुढे कागदपत्रें दाखल करतांना त्याची सत्यता पडताळून पहावी, असे खोटे नंतर ॲडिशन केलेले कागद देवून मंचाची दिशाभूल केल्याचे उघड होते. त्यामुळे स्पॉट इन्स्पेक्शनवेळी संच मांडणी नाही या कारणास्तव तक्रारदाराचा भरपाई मिळण्याचा हक्क डावलता येणार नाही, कारण कृती मानकांचा भंग झाला आहे.

तक्रारदाराने अंतर्गत कक्षाच्या दि. २५.११.२००९ च्या आदेशानुसार दि. १४.१२.२००९ ला चाचणी अहवाल दिल्यापासून ३ महिन्याचे मुदतीत वीज जोडणी देणे जरुरी होते. त्याची पूर्तता करण्यात वि.प.ला अपयश आल्याने वि.प. तक्रारदारास नुकसान भरपाई देणेस जबाबदार आहे.

तक्रारदाराची दुसरी विनंती विद्युत पुरवठा मिळावा, या बाबत वि.प.ने आपल्या लेखी अहवालात तांत्रिक बाबींची अडचण आहे असे कुठेही म्हटले नाही. तक्रारदार यांनी संच मांडणी केलेला नाही व चाचणी अहवाल सादर केला नाही हे स्पष्ट होत नाही त्यामुळे दि. १३.३.२०१० पासून विद्युत पुरवठा मिळे पर्यंतच्या कालावधीसाठी भरपाई मिळण्याचा तक्रारदारास हक्क आहे ते वि.प. नाकारु शकत नाही. तक्रारदार यांनी चाचणी अहवाल देवून, वि.प.ने संयुक्त तपासणी करुन व तक्रारदाराने नियमाप्रमाणे कागदपत्रांची पूर्तता केल्यानुसार प्राधान्यक्रमानुसार तक्रारदारास वीज पुरवठा द्यावा. खालील प्रमाणे आदेश –

## आदेश

१) तक्रार मंजूर करण्यात येत आहे.

२) तक्रारदार यांस वि.प.ने दि. १३.३२०१० पासून नुकसान भरपाई द्यावी.

३) तक्रारदार यांनी नवीन चाचणी अहवाल दिल्यानंतर वि.प.ने संयुक्त पहाणी करुन तक्रारदाराने नियमाप्रमाणे कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर प्राधान्यक्रमानुसार वीज जोडणी तक्रारदारास द्यावी

४) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी.बी. पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

( बी. जी. पवार )
अध्यक्ष